# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५

## (सकाळी ०९.३० ते ११.४५ वाजता )

(क) : **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

**(शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ व शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) — [अनुक्रमांक (१) ]**

(१) **सर्वश्री इद्रिस नायकवडी, विक्रम काळे, शिवाजीराव गर्जे, वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"महाराष्ट्र शासनाने संपूर्ण लिंगायत समाजासाठी महात्मा ज्योती बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केलेली असणे, तथापि लाभ देतांना इतर मागासवर्गात असण्याची अट लादण्यात आलेली असणे, लिंगायत समाजातील सर्वच घटक, इतर मागास संवर्गात येत नाही, केवळ २ ते ३% लोक या संवर्गात मोडत असणे, त्यामुळे संपूर्ण लिंगायत समाजास याचा लाभ मिळत नसणे, महामंडळाच्या स्थापनेचा उद्देश त्यामुळे साध्य होत नसणे, संपूर्ण लिंगायत समाजास याचा लाभ मिळणेसाठी इतर मागास संवर्गाचा असलेला उद्देश वगळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भुमिका."

**(शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) — [अनुक्रमांक (२) ते (५) ]**

(२) **श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री प्रसाद लाड, प्रविण दरेकर वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"महाराष्ट्रात कार्यरत विविध मॅट्रिमोनी वेबसाईट्स व ॲप्सवर अनियंत्रित वापरामुळे फसवणूक, आर्थिक गैरव्यवहार, ब्लॅकमेल, तसेच बनावट प्रोफाइलद्वारे गुन्हेगारी प्रकार वाढणे, या प्लॅटफॉर्म्सवर अनिवार्य KYC, पडताळणी यंत्रणा, तक्रार निवारण प्रणाली किंवा कोणतीही शासकीय देखरेख नसल्याने विशेषतः महिलांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण झाला असणे, सायबर पोलिसांकडे तक्रारी वाढत असताना, चॅट लॉग्स, वापरकर्त्यांची ओळख, IP तपशील उपलब्ध नसल्याने तपास प्रक्रियेवर मोठी बाधा येत असणे, मॅट्रिमोनी सेवांसाठी परवाना किंवा नोंदणी अनिवार्य नसल्याने, विवाहासारख्या संवेदनशील प्रक्रियेत अस्सलतेचा कोणताही वैधानिक निकष अस्तित्वात नसणे, या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारने सर्व मॅट्रिमोनी वेबसाईट्स/ॲप्ससाठी अनिवार्य नोंदणी—परवाना प्रणाली लागू करणे, आधार/पॅन आधारित KYC सक्तीचे करणे, आवश्यक माहिती निश्चित कालावधीपर्यंत जतन करणे बंधनकारक करणे, राज्य सायबर विभागात

"मॅट्रिमोनी फ्रॉड सेल" स्थापन करणे आणि केंद्र सरकारकडे "Online Matrimonial Services Regulation" नियमावली तयार करण्याची शिफारस करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"नागपूर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण भागात १५०० पेक्षा अधिक शाळा असणे, त्यात शिक्षण विभागात कार्यरत विषय पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करण्यासाठी जानेवारी, २०२५ मध्ये निर्णय घेण्यात येणे, त्यानुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या माहे जानेवारी, २०२५ च्या पत्रानुसार गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून आवश्यक माहिती मागविण्यात येऊनही अनेक पंचायत समित्यांनी अद्याप संबंधित माहिती दिली नसल्याने नागपूर जिल्ह्यातील पदवीधर शिक्षक वेतनश्रेणी पासून वंचित राहिल्याचे दिसून येणे, सबब, संबंधित विभागाला निर्देश देऊन पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री विक्रम काळे, सतिश चव्हाण, अमोल मिटकरी, वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"दिनांक १० मार्च, २०२४ च्या संच मान्यतेच्या निकषामुळे राज्यात हजारो शिक्षक अतिरिक्त होण्याची निर्माण झालेली भिती, संच मान्यतेसाठी शासनाने कोट्यवधी रुपये खर्चून डिजीटल प्लॅटफॉर्म निर्माण करणे, यु-डाएस प्रणाली विकसित करणे, त्यावरती राज्यातील सर्व शाळांनी विद्यार्थी संख्येची अचुक माहिती भरणे, त्याला आधार अपडेटची सक्ती करणे, विद्यार्थी वर्गात प्रवेशीत असतांनाही तांत्रिक अडचणींमुळे आधार निघत नसणे, त्यामुळे त्या विद्यार्थ्यांचा निर्माण झालेला शिक्षणाचा प्रश्न, तरीही प्रत्येक शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांची डोके मोजणीची नाहक त्रासाची प्रक्रिया सुरु करणे, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी व तद्नंतर सेवेत आलेल्या शिक्षक-कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे गरजेचे असणे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना इतर विभागाप्रमाणे १०, २०, ३० ची वेतनश्रेणी लागू करणे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती सुरु करणे, २० पटसंख्ये खालील शाळा बंद न करणे, शिक्षकांकडील अशैक्षणिक कामे रद्द करणे, तसेच इतर शैक्षणिक मागणीसाठी दिनांक ५ डिसेंबर, २०२५ रोजी राज्यभर हजारोंच्या संख्येने शिक्षक-कर्मचाऱ्यांनी जिल्हा कचेरीवर मोर्चा काढणे, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री श्रीकांत भारतीय, अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"राज्यात विविध सण-उत्सव, राजकीय कार्यक्रम, मिरवणुका, वाढदिवस समारंभ तसेच विवाह सोहळे यामध्ये मोठ्या प्रमाणावर डीजे सेट,

हाय पॉवर साऊंड सिस्टिम व बास बुस्टर उपकरणे वापरली जाणे, ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी शासनाने नियमावली तयार केली असली तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी न होणे, राज्यातील अनेक जिल्ह्यांत रात्री उशिरापर्यंत उच्च क्षमतेचे डीजे वाजविले जाणे, ज्यामुळे विद्यार्थी, वयोवृद्ध, रुग्ण, नवजात बालके, सामान्य नागरिक त्रस्त असणे, पोलीस प्रशासनाकडे तक्रारी करून देखील योग्य कारवाई न होणे, किंवा उपकरण जप्त करून पुन्हा वापरली जाणे, या डीजे चा आरोग्यावर परिणाम होणे, मानसिक ताण-तणाव तसेच वन्यजीव, पशुधनावर परिणाम होत असणे, पोलीस प्रशासनाकडे तक्रार नोंदविण्यासाठी डिजिटल प्रणाली उपलब्ध करून देणे, सण-उत्सवासाठी स्थानिक स्वराज्य संस्था यांना ध्वनी मर्यादा पाळण्याबाबत स्वतंत्र निर्देश देणे, सर्व जिल्हाधिकाऱ्यांना ध्वनी प्रदूषण नियंत्रण पथक स्थापन करून त्याद्वारे सतत तपासणी कारवाई व जनजागृती मोहीम राबविण्यासाठी निर्देश देणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

**(ख)** : **लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(गुरूवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२५ व शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१)]**

(१) **श्री.श्रीकांत भारतीय, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील शासनाचे सर्व कार्यालयीन कामकाज आणि मानवी क्षमतेच्या कार्यशक्तीची क्रियाशीलता यांचे मूल्यमापन करण्याची आजवर कोणतीही व्यापक व संस्थात्मक व्यवस्था नसणे, शासनाची व्यवस्था ही जनहितासाठी बांधलेली असताना जनतेचा अनुभव काय, सेवा देण्यात विलंब का होतो, कोणता विभाग ठरवलेल्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचला, नागरिकांचे समाधान किती याची माहिती शासनाकडे एकत्रित स्वरूपात उपलब्ध नसणे, याउलट खाजगी क्षेत्रात कंपनीचे उद्दिष्ट ठरवले जाते, key performance indicators / performance indicators बनवले जातात, वेळोवेळी मूल्यांकन होते चुका दूर केल्या जातात आणि संस्थेची / कंपनीची कामगिरी सुधारण्यासाठी ठोस उपाय केले जातात मात्र शासनात अशी व्यवस्था नसणे, अनेक योजनांवर कोट्यवधी रुपये खर्च होतात, परंतु त्या योजनांचा अपेक्षित परिणाम झाला का हे तपासण्याची अधिकृत व पारदर्शक प्रणाली अस्तित्वात नसणे, प्रकल्पांचे नियमित outcome tracking/ performance audit ची यंत्रणा नसणे, सुधारणा प्रक्रिया ( corrective mechanism) अस्तित्वात नसणे, यामुळे तटस्थ खाजगी नामांकित संस्था / कंपनीकडून शासनाचे सर्व विभाग, प्रकल्प, योजना यांचे स्वतंत्र मूल्यमापन करण्याची आवश्यकता असणे, citizen feedback अनिवार्य करून "Maharashtra citizen experience index" तयार करणे, दरवर्षी

department performance तयार करणे, अपयशी प्रकल्पांची कारणमीमांसा ( root cause analysis)करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ व शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (२ व ३)]**

**(२)** **श्री.कृपाल तुमाने, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील aided शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये ट्युशन क्लासेससोबत बेकायदेशीर स्वरूपाचे टाय-अप्स झाल्याची गंभीर माहिती उघडकीस येणे, या टाय-अप्समुळे विद्यार्थी शाळेत दाखल झाल्यानंतर शाळेची नियमित उपस्थिती न लावता दिवसभर क्लासेसमध्येच शिकवले जात असणे, शाळा केवळ नावापुरती उपस्थिती दाखवून विद्यार्थ्यांचे निकाल लावत असणे, यामुळे शासकीय अनुदानाचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर, शिक्षण व्यवस्थेची फसवणूक, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला अडथळा, तसेच मानक शिक्षणाची पातळी घसरत असणे, अनुदानित शाळांना Grant-in-Aid देण्यामागील मूलभूत उद्देश विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे, नियमित उपस्थिती राखणे आणि शाळेतील सुविधांचा व शिक्षकांचा प्रत्यक्ष उपयोग करणे, असे असतानाही विद्यार्थी प्रत्यक्ष शाळेत न जाता दिवसभर क्लासेसमध्ये जात असल्याने शासनाचा निधी विनाकारण खर्च होत असणे, तसेच शाळेतील सामाजिक-सांस्कृतिक उपक्रम, प्रयोगशाळा, क्रीडा क्रिया, नैतिक मूल्य शिक्षण हे सर्व घटक अनुपस्थित राहणे, परीक्षाभिमुख पद्धतीमुळे विद्यार्थ्यांचे संकल्पनात्मक ज्ञान कमकुवत होणे, शाळा व क्लासेसचे दुहेरी भार विद्यार्थ्यांवर अनावश्यक ताण निर्माण करीत असणे, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून ज्या aided शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती ५०% पेक्षा कमी आढळते आणि क्लासेससोबत टाय-अपचा पुरावा सापडतो त्यांचे अनुदान तातडीने स्थगित करण्यात करण्याची तसेच दोषी संस्थांवर आर्थिक दंड वा मान्यता रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३)** **सर्वश्री राजेश राठोड, अभिजित वंजारी, सतेज उर्फ बंटी पाटील, अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात बंजारा समाजाचा समावेश विमुक्त जातीमध्ये असून तेलंगणा, आंध्र प्रदेश व अनेक राज्यामध्ये बंजारा समाज हा आदिवासीमध्ये समाविष्ट असल्याने राज्यात सुध्दा बंजारा समाजाचा समावेश अनुसूचित जमाती (ब) मध्ये करण्याची मागणी अनेकवेळा राज्य शासनाकडे करण्यात आली असणे,

याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यामुळे राज्यातील बंजारा समाजात तीव्र असंतोष पसरल्यामुळे त्यांच्याकडून अनेकवेळा आंदोलने करण्यात आली असणे, याबाबत राज्य शासनाने त्वरीत निर्णय घेऊन शासनाने विमुक्त जाती (अ) मधून अनुसूचित जमाती (ब) मध्ये समावेश करुन देण्याची होत असलेली मागणी विचारात घेता कोणत्याही मूळ आरक्षणाला धक्का न लागता बंजारा समाजाला न्याय देण्यासाठी राज्य शासनाने तातडीने निर्णय घेऊन बंजारा समाजाचा समावेश अनुसूचित जमाती (ब) मध्ये करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (४) ते (११)]**

(४) **ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे शहरातील घोडबंदर मार्गावर जानेवारी ते ऑक्टोबर महिन्यापर्यंत १८ जणांचा रस्त्याच्या दुरावस्थेमुळे मृत्यू झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, ठाणे-घोडबंदर आणि गायमुख घाटातील अरुंद रस्त्यामुळे अनेक वर्षे वाहतूक कोंडीची समस्या कायम असणे, या रस्त्यावर खड्डे आणि रस्त्यांवरील उघड्या मॅनहोल्समुळे अपघातांचे प्रमाण वाढले असणे, दुरुस्ती करूनही एका महिन्यात खड्डे पुन्हा पडले असल्याने याबाबत निकृष्ट कामाची चौकशी करणे गरजेचे असणे, यातील दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची गरज असणे, या मार्गावर नेहमीच वाहतूक कोंडी असणे, ठाणे शहरात जड अवजड वाहने सकाळी ७ ते १० या वेळेत सोडू नका असे आदेश वाहतूक प्रशासनाला वारंवार देऊन सुद्धा वाहतूक शाखेकडून निव्वळ धुळफेक होत असून त्यामुळे वाहतूक कोंडी वाढत असणे, सेवा रस्ता नसल्याने या भागात आता मुख्य मार्गावरूनच भरधाव वेगाने वाहने विरुद्ध दिशेने वाहतूक करत असल्याने या ठिकाणी अनेक गंभीर अपघात होत असणे, ही बाब परिवहन विभागाच्या निदर्शनास येत असतांनाही परिवहन विभाग याबाबत कोणतीही कार्यवाही व उपाययोजना न करणे, घोडबंदर रोडच्या सर्व्हिस रोडचे सुद्धा विलिनिकरणाचे काम सुरू असणे, हे काम तात्काळ थांबविण्याबाबत ठाणेकरांची मागणी असणे, घोडबंदर रोडवर होणारे सततचे अपघात थांबविण्याबाबत परिवहन विभाग व शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **सर्वश्री प्रसाद लाड, प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वॉर्ड नंबर १८१, शांतीनगर, वडाळा, मुंबई येथे कांदळवनाच्या जमीनीवर काही भूमाफिया भरणी करुन मोठ्या प्रमाणात बेकायदेशीरपणे घरे बांधून ती रोहिग्यांना विकत असल्याची बाब माहे जुलै, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, हे भूमाफिया बेकायदेशीरपणे बांधलेली घरे रोहिंग्यांना विकून मोठ्या प्रमाणात फायदा कमवित असणे, या भागात रोहिंग्यांची संख्या प्रमाणाच्या बाहेर वाढत असून या भागालगत असलेल्या समुद्रकिनाऱ्यावरुन देशविघातक कारवाया होण्याची निर्माण झालेली शक्यता, या बेकायदेशीर घरांच्या बांधकामांबाबत स्थानिकांनी महानगरपालिका, जिल्हाधिकारी, मुंबई शहर व पोलीस प्रशासन यांच्याकडे तक्रारी करुनही कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसणे, स्थानिक लोकप्रतिनिधी याप्रकरणी डोळेझाक करीत असल्यामुळे कांदळवनांची कत्तल करुन मुंबईतील मालाड, मालवणी, मनोर, गोराई, बोरीवली, कांदिवली तसेच राज्यातील अन्य ठिकाणी अनधिकृतपणे रोहिंगे रहात असणे, या बेकायदेशीर घरांमध्ये अनधिकृतपणे राहत असलेल्या रोहिंग्यांविरुध्द तातडीने कारवाई करुन ही बांधकामे तातडीने निष्कासित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका."

(६) **श्री.दादाराव केचे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वर्धा जिल्ह्यातील लोअर वर्धा प्रकल्पामध्ये ज्या शेतकऱ्यांची जमिनी प्रकल्पामध्ये गेल्यामुळे ज्यांना जमिनीचा मोबदला कमी मिळाला अशा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वाढीव मोबदला मिळणेबाबत वर्धा जिल्हा सत्र न्यायालयांमध्ये दाखल केलेल्या केसेसचा निकाल प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मान्य असताना सुद्धा विदर्भ पाटबंधारे विभाग नागपूर यांनी हेतू पुरस्परपणे मा.उच्च न्यायालयात अपील दाखल करून प्रकरणे दहा वर्षापासून प्रलंबित असणे, त्यामुळे हे प्रकल्पग्रस्त शेतकरी आर्थिक अडचणीमध्ये येणे, बुडीत क्षेत्रामध्ये गेलेल्या गावांना १८ नागरी सोयी-सुविधा पुरविणे गरजेचे असून आज पर्यंत सर्व वसाहतीमध्ये अर्धवट/अपूर्ण सोयी-सुविधा असल्यामुळे या १९ गावातील समस्यांचे निराकरण करण्याकरिता ३५ कोटी निधीची आवश्यकता असणे, पुनर्वसित गावांमध्ये संपादित जमिनीवर अतिक्रमण करून २० ते ३० वर्षापासून राहत असलेल्या प्रकल्पग्रस्तांना त्याच ठिकाणी घरकुलाचे पट्टे नियमित करून देणे गरजेचे असणे, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना शेतीपर्यंत जाण्याकरिता असलेले पांदण रस्ते नामशेष झाल्यामुळे पर्यायी रस्ते उपलब्ध करून देणे, प्रकल्पातील शेतकऱ्यांना सिंचनाची सोय व्हावी म्हणून शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत पाटसऱ्या नव्याने करण्याची गरज असणे, याकरिता मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याची नितांत आवश्यकता असतांना

सुद्धा याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

(७) **श्री.सुधाकर अडबाले, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद भंडारा व वेतन पथक अधीक्षक (माध्यमिक) भंडारा यांच्या नियमबाह्य व अनियमितता प्रकरणाची झालेल्या तक्रारीनंतर शिक्षण संचालक (माध्यमिक) पुणे यांच्या पत्रानुसार चौकशी समिती नेमण्यात आली असणे, चौकशी समिती नेमली असताना त्यांचा कार्यभार काढण्यात आला नसणे, झालेल्या चौकशीच्या अनुषंगाने प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) भंडारा व वेतन पथक अधीक्षक (माध्यमिक) भंडारा यांच्यावर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत शासनाने याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री.जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील अनुदानित शाळांतील रिक्त जागा भरण्यास शासनाने परवानगी दिलेली असणे, बिगर अल्पसंख्यांक शाळांतील रिक्त पदे पोर्टल व्दारे आणि अल्पसंख्याक संस्थांतील पदे संस्थेव्दारे भरण्यास मुभा दिली जाणे, त्याच धर्तीवर अथवा महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) नियमावली, १९८१ मधील तरतुदीप्रमाणे रात्रशाळेतील रिक्त जागा भरण्यास परवानगी देण्याची आवश्यकता निर्माण होणे, रात्र शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या कष्टकरी युवक आणि युवतींच्या शिक्षणामध्ये शिक्षकांअभावी व्यत्यय निर्माण होणे, गणित, विज्ञान आणि इंग्रजी सारख्या विषयांच्या अध्यापनासाठी एकही शिक्षक उपलब्ध नसणे, अतिरिक्त शिक्षकांच्या तात्पुरत्या समावेशनाव्दारे आजपावेतो अध्यापनाची होणारी पर्यायी व्यवस्था, रात्र शाळेतून सर्व अतिरिक्त शिक्षक काढून घेतल्याने अशा शाळा कोलमडून पडणे, नव्याने नियुक्ती करण्यास परवानगी नाही आणि अतिरिक्त शिक्षकही उपलब्ध नाही, अशा शिक्षक विहीन स्थितीत रात्र शाळांतील वंचितांचे शिक्षण धोक्यात येणे, अत्यल्प संख्येत असलेल्या रात्रशाळा संस्थाचालकांच्या तक्रारी बेदखल राहणे आणि त्यामुळे श्रमजिवी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात निर्माण झालेला अडथळा व याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षण योजना ही दिनांक ०९ जुलै, २०२४ पासून सुरू असणे,या योजनेत १२ वी उत्तीर्ण प्रशिक्षणार्थी यांना

प्रतिमाह ६००० रुपये, आयटीआय अथवा पदविका प्राप्त प्रशिक्षणार्थी यांना प्रतिमाह ८००० रुपये व पदवी तसेच पदवीत्तर पदवी प्राप्त प्रशिक्षणार्थी यांना रुपये १०००० प्रतिमाह प्रमाणे विद्या वेतन देण्यात येणे, सदरचे प्रशिक्षण शासनाने ०६ महिन्यावरून ११ महिन्याकरिता वाढविण्यात येणे, या योजनेतील अधिकाधिक प्रशिक्षणार्थी यांना खाजगी उद्योगातील प्रशिक्षणाची आवश्यकता असणे, या कार्यक्रमामुळे प्रशिक्षणार्थी यांना मिळणाऱ्या कार्य अनुभवाच्या आधारे स्वयंरोजगार सुरू करणेसाठी शासनाकडून या प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार / स्वयंरोजगारसाठी विशेष प्रोत्साहन देण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनामार्फत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **सर्वश्री अशोक उर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात विशेषत: आदिवासी व दुर्गम भागात कुपोषणांमुळे बालमृत्यूच्या घटना घडणे, नंदुरबार, गडचिरोली, पालघर, धुळे, चंद्रपूर जिल्ह्यात शून्य ते पाच वर्षे वयोगटातील ४५ टक्के मुले तीव्र कुपोषित असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२५ च्या सुमारास निदर्शनास येणे, गडचिरोली जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये ४६ टक्के मुले तीव्र कुपोषित गटात मोडतात तर २५ टक्के मुलांचे वजन कमी होणे, वजन कमी असणाऱ्या मुलांचे प्रमाण जास्त असल्याने मुलांची वाढ खुटंली असल्यामुळे कुपोषित बालके संसर्गाला बळी पडून त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होणे, अमरावती जिल्ह्यातील मेळघाट मध्ये बालमृत्यूच्या वाढत्या घटनेमुळे माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये उच्च न्यायालयाने राज्य सरकारला जाब विचारणे, माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये सरकारच्या पोषण आहाराच्या निमित्ताने आरोग्य आणि आहारासंबंधी उपक्रम राबविले जाऊन आदिवासी आणि दुर्गम भागातील बालकांना त्याचा लाभ किती जणांना मिळाला असा प्रश्न उपस्थित केला जाणे, तीव्र कुपोषित बालकांना योग्य प्रकारचा आहार देण्याच्या दृष्टीने एकात्मिक बालविकास विभागाकडून होत असलेली दिरंगाई, परिणामी शासनाप्रती निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने कुपोषण असलेल्या भागामध्ये आशा सेविका तसेच अंगणवाडी सेविकांची पदे भरण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(११) **श्री.संजय खोडके, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अमरावती शहरातील राजकमल चौक, हमालपुरा, रेल्वे स्थानक आणि जयस्तंभ चौकासारख्या महत्त्वाच्या केंद्रांना जोडणाऱ्या, बडनेरा-अमरावती रेल्वे मार्गावरील साखळी क्र.६७१/१४-१५ वरील उड्डाणपुलाचे बांधकाम अनेक

वर्षांपासून प्रलंबित असल्याने, नागरिकांना गंभीर वाहतूक कोंडीचा व गैरसोयीचा सामना करावा लागत असणे, या प्रकल्पासाठी रु. १२५.३७ कोटी इतका निधी अपेक्षित असून सार्वजनिक बांधकाम विभागाने यासंबंधीची पुढील कार्यवाही त्वरित करण्याकरिता दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ रोजी रेल्वे विभागास कळविलेले असणे, तथापि, कामास गती देण्यासाठी शासनाने तातडीने हस्तक्षेप करणे आवश्यक असून अमरावतीकरांची रहदारीची समस्या दूर करण्यासाठी आणि सार्वजनिक वाहतूक सुलभ करण्यासाठी शासनाने तात्काळ आवश्यक निधी मंजूर करून, संबंधित विभागांना (सार्वजनिक बांधकाम आणि रेल्वे) सदर उड्डाणपुलाचे बांधकाम विहित मुदतीत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक** : (क) **प्रश्नोत्तरे**

(ख) **अतारांकित प्रश्नोत्तराची अकरावी ते एकोणतिसावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन** : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री** : "महा मुंबई मेट्रो (एम-३) संचलन महामंडळ मर्यादित यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : (क) "भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (१) इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण, महाराष्ट्र शासन यावरील अहवाल (२) महाराष्ट्रातील जिल्हा खनिज प्रतिष्ठान ट्रस्टसह प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेच्या अंमलबजावणीवरील कामगिरी लेखापरीक्षण अहवाल (३) सन २०२४-२०२५ या वर्षाचा विनियोजन लेखा अहवाल (४) सन २०२४-२०२५ या वर्षाचा वित्तीय लेखा अहवाल, खंड-एक व खंड-दोन" सभागृहासमोर ठेवतील.

(ख) "महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्च यांच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र" सभागृहासमोर ठेवतील.

(ग) "पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाने सादर केलेल्या अहवालातील शिफारशी लागू असलेला कालावधी दिनांक ३१ मार्च, २०२६ पर्यंत वाढविणेबाबतचे पूरक स्पष्टीकरणात्मक ज्ञापन" सभागृहासमोर ठेवतील.

**(४)** **वने मंत्री** : "महाराष्ट्र पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरण (महा कॅम्पा) यांचा सन २०१९-२०२० ते सन २०२१-२०२२ चा लेखापरिक्षण अहवाल व वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(५)** **उद्योग मंत्री** : "महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचा सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(६)** **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** : "महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर यांचा सन २०१९-२०२० ते सन २०२३-२०२४ या वर्षांचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(७)** **दुग्धविकास मंत्री** : "महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई (महानंद) यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(८)** **कृषी मंत्री** : (क) "वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचा सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचा अनुक्रमे एकावन्नावा व बावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ख) "महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **(९)** | **महिला व बालविकास मंत्री** | : | (क) | "महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचा अनुक्रमे तीसावा व एकतीसावा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | (ख) | "महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचे सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| **(१०)** | **परिवहन मंत्री** | : | | "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : "विधानपरिषदेने संमत केलेल्या विधेयकांना विधानसभेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल."**

**चार : संसदीय कार्य मंत्री यांचा प्रस्ताव :-**

**"विधानमंडळ समित्यांच्या दौऱ्यादरम्यान विधानमंडळ सदस्यांचे आचरण कसे असावे याबाबत विचारविनिमय करण्यासाठी दोन्ही सभागृहांच्या सदस्यांचा समावेश असलेली संयुक्त समिती गठित करण्याबाबतचा प्रस्ताव."**

**पाच : "सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत तदर्थ समितीचा" अहवाल सादर करणे.**

**सहा : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ व शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने) -[अनुक्रमांक (१) ]**

(१) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४ वर कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील पदवीधर बेरोजगार युवकांना निर्वाह भत्ता लागू करुन रोजगार प्राप्तीसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याबाबत.

**(शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने)** -**[अनुक्रमांक (२) व (३) ]**

(२) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ७ वर जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री निवेदन करतील :-**

भंडारदरा धरणाचे शताब्दी वर्षात पदार्पण होत असताना उच्चस्तरीय समितीच्या बैठका व नियोजनाअभावी धरणाच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत.

(३) **श्री.अरुण लाड, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १३ वर जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री निवेदन करतील :-**

कर्नाटक सरकारने धरणाची उंची वाढवण्याच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयाबाबत.

(४) **श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १६ वर उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री निवेदन करतील :-**

सेंच्युरी मिल वसाहत, वरळी येथील पुनर्विकास प्रक्रिया अनिश्चिततेत अडकून पडल्याबाबत.

(५) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १९ वर उप मुख्यमंत्री तथा नगरविकास निवेदन करतील :-**

वरळी येथील सेंच्युरी मिलमधील चाळीत वास्तव्य करणाऱ्या रहिवाश्यांच्या पुनर्वसनाचे काम तातडीने करण्याबाबत.

(६) **श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ११ वर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

जगभरातील अभ्यासकांना जैन धर्माचा अभ्यास करता यावा यासाठी कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठात सुरू केलेल्या भगवान महावीर अध्यासन केंद्राच्या इमारतीचे काम रखडले असल्याबाबत.

(७) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १७ वर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांच्या कर्मचाऱ्यांना १०,२० व ३० वर्षाची सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत.

(८) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १५ वर आदिवासी विकास मंत्री निवेदन करतील :-**

पुणे जिल्ह्यासह राज्यातील आदिवासी शासकीय वसतिगृहांमध्ये 'फिटनेस सर्टिफिकेट'च्या नावाखाली विद्यार्थिनींना सुट्टीवरून परतताना सक्तीने 'प्रेग्नन्सी टेस्ट' (UPT) करण्यास भाग पाडणे आणि शासकीय आदेशांचे उल्लंघन करून सुरू असलेला विद्यार्थिनींचा मानसिक व आर्थिक छळ.

(९) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ८ वर ग्रामविकास व पंचायत राज मंत्री निवेदन करतील :-**

गोकर्ण कॉलनी, संगमनगर, खेड, सातारा येथील खाजगी शेतजमीन सर्वे नं.५७/अ/९/१/ब मध्ये ग्रामपंचायतीमार्फत विनासंमती रस्त्याची बोगस नोंद नमुना नं.२६ मध्ये केल्याबाबत.

(१०) **ॲड.अनिल परब, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १४ वर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री निवेदन करतील :-**

वैद्यकीय देयकांची नस्ती तपासताना त्यासाठी पैशाची देवाणघेवाणीची वही सापडल्याबाबत.

**सात : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(क)** (१) **श्री.हेमंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील गृहरक्षक दलातील जवान हे पोलीसांच्या खांद्याला खांदा लावून रात्रंदिवस कर्तव्य बजावत असणे, वेळप्रसंगी त्यांना जीवाची आहुती द्यावी लागणे, परंतु त्यांच्या कुटुंबाच्या किंवा त्यांच्या रक्षणासाठी शासनाने कोणतेच सक्षम उपाय केलेले नसणे, गृहरक्षक दलांच्या विविध मागण्या गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, सर्व होमगार्ड जवानांना १२ महीने नियमित कर्तव्यावर नेमणूक करावी, राज्यातील सर्व होमगार्डना कर्तव्य भत्ता व उपहार भत्त्यात इतर राज्याप्रमाणे वाढ करण्यात यावी, राज्यातील इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे होमगार्डना सुध्दा सर्व भत्ते अनुज्ञेय असणाऱ्या सोई सुविधा देण्यात याव्यात, होमगार्डच्या पाल्यांना, वारसांना होमगार्ड सेवेमध्ये सेवा करण्याची संधी देण्यात यावी, होमगार्ड सेवेचा कालावधी ६० वर्षे करण्यात यावा, दर तीन वर्षांनी होणाऱ्या पुर्ननोंदणीमधील जाचक अटी शिथिल करण्यात याव्यात, पोलीस प्रशासनातील रिक्त पदे शैक्षणिक पात्रता व

होमगार्ड सेवेच्या अनुभवाच्या आधारे मानसेवी होमगार्डमधून भरण्यात यावेत, होमगार्ड यंत्रणेतील वेतनी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे होमगार्डमधूनच भरण्यात यावीत, कार्यालयीन ऑनलाईन कामकाजासाठी संगणक प्रणाली संच देण्यात यावेत, अंशकालीन लिपीक मानधन महीना १० हजार रुपये देण्यात यावे, अंशकालीन शिपाई यांचे मानधन ५ हजार रुपये करण्यात यावे, इत्यादी विविध मागण्या प्रलंबित असणे, शासनाने गृहरक्षक दलातील जवानांच्या मागण्यांवर तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **श्री.संजय केनेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री** लक्ष वेधतील :-

"छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचा शहर विकास आराखडा तयार करताना शासकीय कार्यालयांचा आपसामध्ये योग्य तो ताळमेळ नसल्यामुळे नियोजन आराखड्यामध्ये अक्षम्य चुका झालेल्या असणे, भूमी अभिलेख कार्यालयाचे सर्वे किंवा गटांचा जो नकाशा आहे ते गाव नकाशे आपसामध्ये जुळून संपूर्ण शहराचा गाव नकाशा बनवणे अपेक्षित असणे, तसे झालेले दिसून न येणे, कारण महानगरपालिकेने दिलेल्या परवानग्यामधील गट, सर्वे नंबर मधील बांधकामे, डीपी रोड, आरक्षित जागा, काही भागाचे आरक्षण रद्द करून नवीन कुठे आरक्षित केले हे सुद्धा न समजणे, जुन्या व नवीन विकास आराखड्याच्या नकाशामध्ये एक गट दुसऱ्या गटात सरकल्याचे दिसून येणे, त्यामुळे भूमीअभिलेख कार्यालयातून धन दांडगे, भूमाफियांनी त्यांना हवा तसा नकाशा मिळवून घेतल्यामुळे बऱ्याच वर्षांपासून जमीन ताब्यात असलेल्या काही गरीब लोकांवर अन्याय झालेला असणे, ही भूमी अभिलेख कार्यालयाची चूक की परवानगी देताना महानगरपालिकेची चूक यामध्ये सर्वसामान्य नागरिक हैराण होणे, प्रचंड आर्थिक खर्च व मानसिक ताण होऊन सुद्धा त्यांच्या पदरी निराशाच पडणे, त्याकरिता शासनामार्फत गाव नकाशापासून ते नवीन डीपी प्लॅन व जुना डीपी प्लॅन मधील आरक्षणे, रस्ते, राखीव जागा, नियोजित ठिकाणीच आहेत किंवा कसे याबाबतची चौकशी होणे आवश्यक असणे, त्याकरिता उच्चस्तरीय समिती नेमून दोषींविरुद्ध योग्य ती कार्यवाही करणे, भूमाफियांनी शहराच्या नवीन विकास आराखड्यामध्ये याआधी शासकीय योजनेचा फायदा घेऊन परवानग्या मिळवल्या व त्या अनुषंगाने करोडो रुपयांच्या सवलती सुद्धा मिळविल्या असणे, नवीन विकास आराखड्याचा फायदा घेत

याच लोकांनी परत एकदा या नवीन विकास आराखड्याचा फायदा घेऊन शासनाकडून मोबदलाही मिळवलेला असणे, एकाच जागेचा डबल मोबदला-डबल फायदा उचलणे, याबाबतची चौकशी होणे आवश्यक असणे, निवृत्त उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून चौकशी करण्याची व दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.सदाशिव खोत, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री** लक्ष वेधतील :-

"मे. एक्सपिरिओ कॅचर्स, भूखंड क्र. ०७,सेक्टर क.२९, नेरूळ, नवी मुंबई या प्रकल्पाचे बांधकामास नवी मुंबई महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडून एकत्रित बांधकाम नियंत्रण नियमावली २०२० मधील, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४५ (१) (३) मधील तरतुदीनुसार दिनांक ०६ जानेवारी, २०२३ रोजी निवासी व वाणिज्य प्रयोजनासाठी बांधकाम परवानगी देणे, मे.एक्सपिरिओ व्हेंचर्स यांचा प्रस्ताव आर्किटेक्टने सादर केलेला असून बांधकाम परवानगी देताना नियमांचे उल्लंघन झालेले असणे, त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विमानतळाचा विकास आराखडा न केल्यामुळे दळणवळणचे प्रश्न निर्माण होणे, काही विशिष्ट विकासकांचे व त्यांच्या आर्किटेक्टने सादर केलेल्या बांधकामांना परवानगी दिल्याने नियमावलीचे खुलेपणाने उल्लंघन होणे, या प्रकल्पामधे वाहनतळाचे बांधकाम करताना एकत्रित बांधकाम नियमावली मधील स्टेक पार्किंग पहिला बेसमेंट फ्लोअर लेवल ४.५० मी. ऐवजी ३.८० मी.इतकी सवलत देण्यात आलेली असणे, त्यावर केवळ ३ मीटर इतकेच वाहनतळ बांधकाम केले असून यामधे स्टेक पार्किंगची सुविधा दाखवली असणे, ३ मीटर बांधकामामध्ये स्टेक पार्किंग करणे अशक्य असून अशा प्रकल्पास बांधकाम अंतिम पुर्णत्व दाखला दिल्यास नियमावालीचे गंभीर उल्लंघन होऊन तेथे पार्किंगचा प्रश्न उद्भवणार असणे, स्टेक पार्किंग प्राऊड फ्लोअर व मार्जिनल डिस्टंन्सयामध्ये अनियमितता झालेली असणे, काही वास्तुविशारद व पालिका अधिकारी मिळून बांधकाम नियमावलीमध्ये अनधिकृत सवलती देवून अनेक इमारतींचे आराखडे मंजूर करत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

(४) **श्री.सचिन अहिर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्री** लक्ष वेधतील :-

"शासन निर्णयानुसार ६ व्या वेतन आयोगानसार १२ व २४ वर्षे महाराष्ट्र शासनाने केंद्राच्या धर्तीवर कर्मचाऱ्यांची कुंठीतता घालवण्यासाठी आश्वासित प्रगती योजना जाहिर करणे, कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवाकाळात किमान २ ते ३ पदोन्नती मिळावी याच शासनाचा उद्देश असणे, हा पदोन्नतीचाच एक भाग असून ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाही अशा कर्मचाऱ्यांना १२ व २४ वर्षे सेवेनंतर आश्वासित प्रगती योजना कर्मचाऱ्यांना थेट लागू करण्यात येणे, ७ व्या वेतन आयोगानुसार १०, २० व ३० वर्षानंतर सुधारित सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात येणे, परंतु हाफकिन महामंडळास ७ वा वेतन आयोग लागू झालेला नसणे, शासन निर्णयानुसार महामंडळातील कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना १९८७ पासून लागू असणे, सन २०१३ पासून योजना बंद असणे, संचालक मंडळाने सदर योजना महामंडळातील कर्मचाऱ्यांना लागू करण्यास मंजूरी, हाफकिन महामंडळातील १६० कर्मचारी गेल्या २२ ते २४ वर्षे पदोन्नतीपासून वंचित असणे, ८ कर्मचारी तर एकही पदोन्नती न घेता सेवानिवृत्त झाले असणे, आश्वासित प्रगती योजना लागू केल्याने ३ लाख ५९ बोजा पडणे, वित्त मंत्र्यांसमवेत झालेल्या बैठकीत योजना लागू करण्याचा निर्णय, परंतु हाफकिन महामंडळातील व्यवस्थापकीय संचालक यांचा योजना लागू करण्यास नकार, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, आश्वासित प्रगती योजना लागू करुन थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत शासनस्तरावर करावयाची कार्यवाही."

(५) **श्रीमती चित्रा वाघ, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्री** लक्ष वेधतील :-

"अंधेरी (प) येथील अरेना, रोहित अपार्टमेंट व मोटा मेन्शन को-ऑप. सोसायटीसह इतर पाच सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुर्नविकासासाठी उपनिबंधकांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधीने शासन निर्णयांचे उल्लंघन करून बेकायदेशीर विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करणे, दिनांक ४ जुलै, २०१९ च्या निर्णयानुसार २/३ प्रत्यक्ष उपस्थिती अनिवार्य असतांना, तसेच दिनांक १२ मे, २०२२ च्या निर्णयानुसार ऑनलाईन उपस्थिती रद्द असतानाही, संबंधित प्रतिनिधीने ऑनलाईन उपस्थिती लागू मानून सभांना बेकायदेशीर मान्यता देणे, याबाबत प्रश्न उपस्थित होताच

सभागृहाची दिशाभूल करणारी खोटी माहिती सादर करणे, अरेना (७७ पैकी ४५), रोहित (८० पैकी ४३), मोटा मेन्शन (६३ पैकी ३६) येथे २/३ पेक्षा कमी प्रत्यक्ष उपस्थिती असतानाही अनुक्रमे ७५.३२%, ७३.७५%, ७१.४२% उपस्थिती दाखवून विकासकाला शेकडो कोटींचा लाभ मिळेल अशाप्रकारे सभासदांची फसवणूक करणे, मुंबई शहर उपनगर जिल्ह्यामध्ये पाच वर्षांत किती व कोणकोणत्या सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये पुनर्विकासासाठीच्या विशेष सर्वसाधारण बैठका आयोजित करण्यात आल्या, त्यात प्रत्यक्ष व ऑनलाईन उपस्थित सभासदांची संख्या किती होती, अन्य नियमांचे उल्लंघन करण्यात आले का, याचा सविस्तर तपशील पडताळून, प्रकरणांची महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सखोल चौकशी होण्याची व दोषींविरुध्द कडक कायदेशीर कारवाई होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६)** **डॉ.प्रज्ञा सातव, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** लक्ष वेधतील :-

"राज्यातील सर्व दिव्यांग शासकीय कर्मचा-यांची तीन महिन्यात पडताळणी करा असा शासन आदेश दिव्यांग कल्याण विभागाचे आयुक्त यांनी जारी केला असणे, वास्तविक आरोग्य विभागाच्या शासन आदेशानुसार दिव्यांग प्रमाणपत्र देण्याचा अधिकारी जिल्हा रुग्णालये, महापालिकेचे दवाखाने, वैद्यकीय महाविद्यालये व केंद्र सरकारच्या संस्थांना असणे, या रुग्णालयातील तीन सदस्यीय मंडळाने दिव्यांग व्यक्तीला तपासणी करुन त्याला ऑनलाईन प्रमाणपत्र द्यावयाचे असणे, मात्र या मंडळातील केवळ सदर दिव्यांग प्रवर्गाशी संबंधित तज्ञ डॉक्टरच व्यक्तींची तपासणी करीत असणे, त्यामुळे गैरप्रकार होत असणे, त्यामुळे दिव्यांग प्रमाणपत्राचे अधिकार एकट्या आरोग्य यंत्रणेच्या हातात एकवटले असल्याने ही प्रमाणपत्रे खोटी आहेत कसे ठरविणार याबाबत साशंकता असणे, त्यामुळे शासनाने दिव्यांग प्रमाणपत्र देतांना शासकीय डॉक्टरांच्या तपासणी शिवाय अन्य विभागाची व पुराव्यासाठीची जोड देणे व या प्रमाणपत्रांची सक्तीने पडताळणी करणे आवश्यक असतांना शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील जनतेत व्यक्त होत असलेला असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ख) लक्षवेधी सूचनेवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे. (जोडपत्र पहावे.)**

**आठ : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**नऊ : मा.समिती प्रमुख, विधानपरिषद विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव –**

विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

**(१)** सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.सुनील शिंदे यांनी उप मुख्य अभियंता (शहर), इमारत प्रस्ताव विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, वडाळा, मुंबई यांचेविरुध्द दिनांक २ मे, २०२३ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

**(२)** सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.प्रविण दरेकर यांनी श्रीमती सुषमा अंधारे, प्रवक्त्या शिवसेना (उबाठा) गट व स्टँडअप कॉमेडियन श्री.कुणाल कामरा यांचेविरुध्द दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

**(३)** सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. श्रीकांत भारतीय व श्री. प्रविण दरेकर यांनी श्री. सुर्यकांत हौसराव मोरे, मु.पो. रत्नापूर, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्याविरूध्द दिनांक २४ नोव्हेंबर, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

या तीन प्रकरणावरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानपरिषद नियम १७८ च्या पोट नियम (१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

**दहा : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**सर्वश्री संजय खोडके, विक्रम काळे, अमोल मिटकरी, वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्यातील मागास व अविकसित भागांचा समतोल विकास साधण्यासाठी राज्य शासनाने वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून सन १९९४ मध्ये विदर्भ वैधानिक विकास महामंडळाची करण्यात आलेली स्थापना, या विकास मंडळाच्या माध्यमातून सन १९९५-९६ पासून वार्षिक रक्कम शासनाकडून देण्यात आल्यामुळे या निधीचा उपयोग करुन लहान-मध्यम विकास कामांसाठी पायाभूत सुविधा, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, पाणी पुरवठा, रस्ते इत्यादी कामांसाठी उपयोगात आणून काही प्रमाणात अनुशेष भरुन काढण्यात आला असला तरीही निधी पुरेसा प्राप्त न झाल्यामुळे व्यवस्थापन, जमिन मिळणे, कामाचे नियोजन, वेळेत कामे न होणे या अनेक कारणांमुळे अद्यापही अनेक प्रकल्प हे अपूर्ण आहेत, त्यामुळे विदर्भाचा अनुशेष हा अद्यापही बाकी असल्यामुळे निधीअभावी अनेक प्रकल्प सुरु होऊनही पूर्ण

झाले नसल्यामुळे विदर्भातील अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा येथील उद्योग, सेवा, सिंचन, रस्ते, वीज कनेक्शन, आरोग्य, शिक्षण, पाणी पुरवठा इत्यादीबाबतचा अनुशेष अद्यापही मोठ्या प्रमाणात शिल्लक राहणे, विशेषत: विदर्भातील सिंचन प्रकल्पाचा अनुशेष मोठ्या प्रमाणात असून अद्यापही १२३ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ४३ हजार ५६० कोटी रुपयांची असलेली आवश्यकता, विदर्भातील सिंचनाची ३६ टक्के कामे अद्यापही निधीअभावी अपूर्ण असणे, परिणामी या भागातील शेतकरी, कष्टकरी व युवकांमध्ये वाढलेली बेरोजगारी व आर्थिक विषमता लक्षात घेता विदर्भ वैधानिक विकास महामंडळाचा असलेला अनुशेष पूर्ण भरुन काढण्यासाठी शासनाने तात्काळ करावयाची आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना."

**अकरा : शासकीय विधेयक –**

**विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०९ – महाराष्ट्र कारागृहे व सुधारसेवा विधेयक, २०२५"

**बारा : (शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव) – (मंत्र्यांचे उत्तर)**

**सर्वश्री सतेज उर्फ बंटी पाटील, मिलिंद नार्वेकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव –**

"राज्यात महिलांवरील बलात्कार व खूनासारख्या गंभीर गुन्ह्यांत वाढ होत असताना, प्रभावी प्रतिबंधक उपाययोजना करण्यात शासन पूर्णपणे अपयशी ठरले असून, महिलांच्या सुरक्षिततेबाबत शासनाची उदासीनता उघड होत असणे, साक्री तालुक्यातील जि. धुळे येथे यात्रेत गेलेल्या एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन तिचा झालेला भीषण खून ही एक मन सुन्न करणारी घटना उघडकीस आलेली असणे, उल्हासनगर येथील एका अल्पवयीन मुलीवर विनयभंग केल्या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपीची जामिनावर सुटका झाल्यानंतर त्या आरोपी सोबत असणाऱ्या गावगुंडांनी पीडितेच्या घरासमोरून काढलेली मिरवणूक, मुंबई शहरात गेल्या ६ महिन्यात मुंबईत ४९४ महिलांवर बलात्कार झाल्याच्या घटना घडणे, त्यामुळे मुंबई शहर सुद्धा आता महिलांसाठी सुरक्षित राहिलेले नसणे, संतोष देशमुख प्रकरणी अद्यापही आरोपींना अटक झालेली नसणे,

कृष्णा आंधळे अद्यापही फरार असणे, मुख्य आरोपीला जामिन मिळण्याची जनमानसात होत असलेली चर्चा, नांदेड येथील सक्षम ताटे या युवकाची जातीय वादातून झालेली हत्या, गृह खात्यातील भ्रष्टाचाराच्या तक्रारी सातत्याने समोर येत असतानाही दोषींवर ठोस कारवाई न करता शासन त्यांचे संरक्षण करत असल्याचे निदर्शनास येणे, यामुळे कायदा-सुव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास ढासळत असणे, शासन पोलिस यंत्रणेचा वापर हा राज्यात कायदा-सुव्यवस्थेसाठी न करता राजकीय विरोधकांना दडपण्यासाठी करीत असणे, मुंढवा येथील मौल्यवान जमिनींचे आरक्षण बदलताना शासनाने सार्वजनिक हिताकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून राजकीयदृष्ट्या प्रभावशाली व्यक्तींना लाभ होईल अशा प्रकारे निर्णय घेण्यात येणे, उक्त व्यवहारात महसूल, नगरविकास व नोंदणी विभागातील अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याचे स्पष्ट होत असूनही शासनाने अद्याप जबाबदारी निश्चित न करता प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केलेला असणे, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाच्या सुमारे ७०० कोटी रुपयांच्या औषध खरेदी टेंडरमध्ये Schedule-M सारख्या जाचक अटी लावून स्पर्धा मर्यादित करण्यात आली असून, निवडक पुरवठादारांना लाभ देण्यासाठीच शासनाने ही प्रक्रिया राबविली असणे, जीव औषध निर्माण महामंडळामध्ये मोठया प्रमाणाात गैरव्यवहार होत असणे, छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने थेट प्राधिकरणाला पत्र लिहून त्यांच्या कार्यालयाला पाठविलेल्या अतिरिक्त औषध पुरवठ्यावर जोरदार आक्षेप घेतला असणे, नाशिक जिल्हा शल्य चिकित्सक यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन आरोग्य विभागाची प्रतिमा मलिन करीत असणे, पालघर जिल्हयातील मनोर ग्रामीण रुग्णालयात प्रसुतीसाठी आलेल्या महिलेचा उपचाराअभावी मृत्यु होणे, मुंबई व नवी मुंबईतील सार्वजनिक उपयोगासाठी राखीव असलेली जमीन आरक्षणातून वगळून ती विकासकांना देण्याचे धोरण शासन राबवित असल्याने सामान्य नागरिकांच्या हक्कांवर गदा आणत शहरी नियोजन अस्ताव्यस्त करणे, नगरविकास विभागाकडून आरक्षित भूखंडाच्या संरक्षणाबाबत जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असून, आरक्षणाचा हेतू मोडीत काढून विशिष्ट हितसंबंधी विकासकांच्या फायद्यासाठी जमिनींचा वापर बदलला जात असणे, कंत्राटदारांना लाभ देण्यासाठीच नगर परिषदांमध्ये निधी उपलब्ध नसताना वैशिष्ट्यपूर्ण कामांना मंजुरी देण्यात येणे हे थेट आर्थिक शिस्तभंगाचे उदाहरण असणे, शासनाच्या दुर्लक्षामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मोठ्याप्रमाणात गैरव्यवहार होत असणे, नगर परिषद निवडणुकांमध्ये आधी २७% ओबीसी आरक्षण असल्याचे जाहीर करून नंतर ते कायदेशीर अडचणीत आणण्याची परिस्थिती निर्माण होणे हे शासनाच्या अकार्यक्षम नियोजनाचे व दिशाभूल करणाऱ्या धोरणाचे द्योतक असणे, यामुळे ओबीसी समाजाच्या घटनात्मक

हक्कांवरच घाला येणे, रस्ते बांधकामामध्ये प्रचंड भ्रष्टाचार होणे, सरकारी नोकर भरती व इतर योजना संबंधित अनेक घोषणा करणे, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत निधी उपलब्ध नसतानाही निविदांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, तसेच उघड अनियमितता असूनही कोणतीही कारवाई न करणे हे शासनाच्या आर्थिक बेजबाबदारपणाचे व कंत्राटदार धार्जिण्या धोरणाचे स्पष्ट द्योतक असणे, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक किलोमीटर रस्त्यांना मंजुरी देणे हे आर्थिक अनियमिततेचे व निधी अपहाराचे ठळक उदाहरण असणे. शासनाने यावर अद्याप कोणतीही चौकशी करण्यात न येणे, केंद्र व राज्य शासनाने ठरवून दिलेल्या जलजीवन मिशन व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजनांमध्येही मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असून, अंमलबजावणीमध्ये प्रचंड तफावत आढळून येणे, शासनाच्या ढिसाळ नियंत्रणामुळे ही महत्त्वाची योजना भ्रष्टाचाराचे साधन बनलेली असणे, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील निविदा प्रक्रियेत वारंवार अनियमितता, निवडक कंत्राटदारांना फायदा व कामे प्रलंबित राहणे तसेच HAM पध्दतीच्या निविदांमध्ये mobilisation charges च्या नावाखाली मोठयाप्रमाणात वसुली करून सार्वजनिक निधीचा अपहार केला जात असल्याचे आरोप असणे, मुंबई-नागपूर-चंद्रपूर,पुणे-ठाणे इत्यादी शहरांमध्ये हवेचे गंभीर प्रदूषण वाढले असल्याने हवेची गुणवत्ता धोक्याच्या पातळीवर गेल्याने नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होणे, प्रदूषण नियंत्रण यंत्रणेची कार्यवाही अपुरी असणे, कामगार कायदयात केंद्र शासनाने बदल केल्याने त्याचा परिणाम माथाडीवर झाला असून माथाडी कामगारांमध्ये गैरप्रकार वाढत असणे अशा प्रकारांना शासनाकडून पाठबळ देणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

तेरा : **(गुरूवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२५, शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ व शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (मंत्र्यांचे उत्तर)**

**श्री.सतेज उर्फ बंटी पाटील,** ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, वि.प.स. यांचा **म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात माहे जून ते सप्टेंबर या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी-ओला दुष्काळ यामुळे राज्यातील शेतकरी हवालदिल झालेला असणे,

शेतकऱ्यांना देण्यात आलेले मदतीसाठीचे पॅकेज "फसवे" असणे, बहुतेक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष तुटपुंजी मदत मिळणे, शेतीचे पंचनामे करण्यास प्रशासनाकडून विलंब होत असल्याने निधी वितरणात गोंधळ उडालेला असणे, अब्जावधींचे पीक कर्ज थकित असताना शेतकऱ्यांना कर्जमाफी न देता व्याजाचा अधिक बोजा लादणे हा निर्णय शेतकऱ्यांना अधिक खोल कर्जामध्ये ढकलणारा असणे, मा.मुख्यमंत्री यांनी कर्जवसुली स्थगितीची घोषणा करणे, परंतु प्रत्यक्ष आदेश न देता बँका शेतकऱ्यांच्या घरांवर धाड मारत असणे, राज्य व केंद्र शासनातील मतभेदांमुळे प्रस्ताव सादरीकरणात झालेल्या विलंबाचा थेट परिणाम म्हणून शेतकरी आत्महत्यांच्या प्रकरणात झालेली वाढ, कापूस-सोयाबीन-धान-ऊस बाजारभाव, खरेदी प्रक्रिया, आयात धोरणे आणि हवामानामुळे निर्माण झालेल्या संकटांवर शासनाचे सततचे मौन व निष्क्रियता ही शेतकऱ्यांविषयीची गंभीर उदासीनता आणि प्रशासकीय अपयश स्पष्टपणे अधोरेखित करणे, राज्यातील अनेक महत्वाच्या महानगरपालिका, नगरपरिषद व विकास प्रकल्पांमध्ये भ्रष्टाचार, अनियमितता आणि निकृष्ट दर्जा सतत निदर्शनास येवूनही जबाबदार अधिकारी, कर्मचारी व ठेकेदार यांचेवर कारवाई करण्यास होत असलेले दुर्लक्ष, प्राथमिक, माध्यमिक व उच्च  माध्यमिक शिक्षकांची जुनी पेंशन, नियमित वेतन, वेतनेत्तर इतर भत्ते, पदभरती, शिक्षक भरती, संच मान्यतेचे निकष बदलविणे, समायोजन समग्र शिक्षा अभियानंतर्गत  २५०० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत समावून घेणे इत्यादी प्रश्न निकाली न निघणे, उच्च शिक्षण विभागांतर्गत प्राध्यापक भरती न होणे, शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेतन लागू न झाल्यामुळे त्यांच्या मध्ये असंतोष पसरणे, कामगार विभागातील गृह उपयोगी व सेफ्टी किट निविदेतील गैरव्यवहार, निकृष्ट दर्जाच्या वस्तूंची खरेदी, निविदा प्रक्रियेत पारदर्शकता नसणे, बंजारा समाजाचा अन्य राज्याप्रमाणे आदिवासी संवर्गात समावेश करणे, मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या इमारतीचा प्रश्न, ७९ बी कायदयामुळे इमारती पुनर्वसनाचे प्रकल्प रखडणे, केंद्र शासनाच्या अंतर्गत जमीन विकास न होणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जल जीवन मिशन योजनेअंतर्गत अनेक कामे अपुर्णावस्थेत असूनही ठेकेदारांना देयके वितरीत करुन करण्यात आलेला गैरव्यवहार, राज्यातील परिवहन खात्यात मोठया प्रमाणात होत असलेला गैरव्यवहार, उक्त प्रकरणी तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**चौदा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

**(बुधवार, दिनांक १० डिसेंबर, २०२५ व शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित**

**असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक १]**

**(१) सर्वश्री. शशिकांत शिंदे, एकनाथराव खडसे, अरुण लाड, वि.प.स**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये दिनांक ५ जानेवारी, २०२४ पासून कार्यरत सुरक्षा रक्षकांना माहे जानेवारी, २०२४ ते मे, २०२४ पर्यंत शासन निर्णयानुसार वेतन प्राप्त होणे, परंतु, महानगरपालिका आयुक्त यांनी आस्थापना विभागास सुरक्षा रक्षकांना २८ हजार प्रमाणे वेतन देण्याचे आदेश दिल्यामुळे माहे जून, २०२४ पासून ते आजपर्यंत रुपये २८ हजार प्रमाणे वेतन अदा करण्यात येत असणे, महानगरपालिकेकडून शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे सुरक्षा रक्षक मंडळ, ठाणे विभाग यास वेतन अदा करण्यात येत नसल्यामुळे महानगरपालिकेकडून मंडळास अदा करण्यात येणाऱ्या वेतनात कपात होणे, सुरक्षा रक्षक मंडळाकडे कमी वेतन गेल्यामुळे सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षकांना प्रति महिना पूर्ण वेतन अदा न होणे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेंतर्गत कार्यरत सुरक्षा रक्षक यांना नियमित वेतन मिळत नसल्यामुळे मंडळाचे अध्यक्ष यांच्याकडे तक्रार केली असता अध्यक्षांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त यांना शासन निर्णयाप्रमाणे वेतन काढण्यास वारंवार पत्रव्यवहार केला असणे, तरी देखील महानगरपालिका आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त यांनी शासन निर्णयाप्रमाणे वेतन न देणे, राज्यात अन्य महानगरपालिकेंतर्गतच्या आस्थापना विभागांमध्ये कार्यरत सुरक्षा रक्षक मंडळ यास शासनाने नियमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे वेतन अदा करण्यात येत असून, केवळ मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्येच कमी वेतन अदा करण्यात येत असणे, त्यामुळे सुरक्षा रक्षक मंडळाकडून मिळणारे फायदे सुरक्षा रक्षकांस मिळत नसणे, परिणामी प्रति महिना पूर्ण वेतन न मिळाल्याने सुरक्षा रक्षकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असून, मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील सुरक्षा रक्षकांना शासनाने नियमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे वेतन अदा करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही."

**(गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२५ व शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक २ व ३]**

**(२) सर्वश्री अमोल मिटकरी, विक्रम काळे, शिवाजीराव गर्जे, वि.प.स.**

"राज्यातील खाद्य पदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी पुरेशी यंत्रणा अस्तित्वात नसल्याने मोठया प्रमाणात भेसळीचे प्रकार निदर्शनास येणे, दूध,

दही, तूपासह बाटलीबंद पाणी, अंडी, पनीर, खवा याचबरोबर औषधे तसेच पिकांवर फवारणी केली जाणारी किटकनाशके यामध्ये मोठया प्रमाणात भेसळ होत असल्याची बाब निदर्शनास येणे, जनतेचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या या भेसळ करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता असणे, खाद्य पदार्थांतील भेसळीची तपासणी करण्याकरीता आवश्यक किट, पुरेशी अत्याधुनिक यंत्रसामुग्री, मनुष्यबळ, प्रयोगशाळा इत्यादी बाबींचा अभाव असणे, भेसळ करणारे हे त्यांचा नफा वाढविण्याच्या उद्देशाने भेसळ करीत असून त्याचा जनतेच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असणे, राज्यात भेसळ परिक्षणाच्या केवळ दोनच प्रयोगशाळा अस्तित्वात असल्याने भेसळयुक्त पदार्थांच्या चाचण्यांसाठी विलंब होत असणे, सदर अन्न पदार्थांतील भेसळीच्या माध्यमातून कोट्यवधी रकमेचा गैरव्यवहार होणे, अन्न पदार्थातील भेसळीचे तसेच बनावट औषध कंपन्यांचे रॅकेट रोखण्यासाठी अन्न सुरक्षा मानक कायदयाची कठोर अंमलबजावणी करुन व अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अधिकाधिक प्रयोगशाळा निर्माण करुन जनतेमध्ये जनजागृती करण्याकरिता उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(३) सर्वश्री सत्यजीत तांबे, किशोर दराडे, विक्रम काळे, वि.प.स.**

"महाराष्ट्र राज्यात लाखो शिक्षक सेवक, विशेषतः खाजगी प्राथमिक शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांना शिक्षण हक्क कायद्याच्या (RTE) अंमलबजावणीच्या नावाखाली टीईटी (TET) परीक्षा उत्तीर्ण होण्याची सक्ती करण्यात आली असणे, नऊ वर्षांहून अधिक काळ प्रामाणिकपणे सेवा दिल्यानंतरही केवळ टीईटी परीक्षा उत्तीर्ण नसल्याच्या कारणास्तव नोकरी गमाविण्याची भीती निर्माण झाली असून त्यामुळे सदर शिक्षकांवर आणि त्यांच्या कुटुंबावर गंभीर मानसिक व आर्थिक संकट ओढवले असणे, केंद्र शासनाने सन २०१२ पूर्वी नियुक्त केलेल्या शिक्षकांना टीईटी परिक्षेतून सूट दिलेली असताना, राज्य शासनानेही त्याच धर्तीवर सेवाज्येष्ठता विचारात घेऊन लाखो शिक्षकांना दिलासा देण्याची आवश्यकता असणे, वारंवार मुदतवाढ देऊनही अनेक शिक्षक टीईटी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकले नाहीत, कारण टीईटी परीक्षेचे स्वरूप व अभ्यासक्रम अत्यंत क्लिष्ट असणे, हा प्रश्न केवळ टीईटी परिक्षेपुरता मर्यादित नसून राज्यातील हजारो शिक्षकांच्या रोजगाराशी निगडित असणे, तरीही या गंभीर प्रश्नाकडे शासकीय यंत्रणेने दुर्लक्ष केलेले असणे, तसेच जुन्या पेन्शन योजनेचा लाभ नाकारल्यामुळे शिक्षकांमध्ये असंतोष वाढलेला असणे, या सर्व पार्श्वभूमीवर शासनाने मानवतेच्या दृष्टीकोनातून संबंधित शिक्षकांना सेवा संरक्षण प्रदान करणे अत्यंत आवश्यक असणे, त्यांची सेवाज्येष्ठता व अनुभव विचारात घेऊन

टीईटी परिक्षेतून सूट देण्याबाबत सकारात्मक व आवश्यक निर्णय शासनाने तातडीने घ्यावा, अशी मागणी करण्यात येत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**"राष्ट्रगीत."**

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १३ डिसेंबर, २०२५

**डॉ.विलास आठवले**
सचिव - ३ ,
महाराष्ट्र विधानपरिषद

शासकीय मुद्रणालय, नागपूर